सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी

# शिववाणी

SHIV VANI

RNI : MAHMAR2003/14666 | L/130/RNP/Renewal/2025-2026

बीड (महाराष्ट्र) | साप्ताहिक | मराठी | वर्ष २३ वे | अंक ४० वा | सोमवार दि.५ जानेवारी २०२६ | मो.९४२२७४८७९२/९८२२६२८५२१ | पान ४ | किंमत ३ रु.

Beed (Maharashtra) | Weekly | Marathi | Year 23 | Issu 40 | Monday. 5 Jan 2026 | Mo.9422748792/9822628521 | Page 4 | Prize Rs.3

सुविचार

हारल्यावर नवीन सुरुवात करण्यासाठी कोणी सोबत नसले तरी चालेल, फक्त स्वतःवर विश्वास हवा.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# जनतेच्या पैशातून होणारी विकासकामे दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण करा : अजित पवार

## बीडमध्ये नूतन वर्षाच्या पहिल्या दिवशी 1363 विकास कामांचे उद्घाटन

बीड (प्रतिनिधी) बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य आहे. यासाठी सर्वांची सोबत आवश्यक आहे. भारतीय संविधान, कायद्याचा आदर करत बीडकरांनी दैनंदिन जीवनात बीडच्या विकासासाठी शिस्त पाळावी, असे आवाहन जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडवासीयांना केले.

जनतेच्या पैशातून होत असलेली विविध विकासकामे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण होतील, यावर बारकाईने लक्ष द्यावे, अशा सूचनाही जिल्हा प्रशासनाला उपमुख्यमंत्र्यांनी केल्या. शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर जिल्ह्यातील 1363 विकासकामांचे भूमिपूजन व पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. जिल्हा परिषद बीड अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेतील विविध विकासकामांचे भूमिपूजन, टेनिस कोर्टाचे उद्घाटन श्री. पवार यांच्या हस्ते झाले. यासह प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत 'दिवाळी नवीन घरात' उपक्रमाचा समारोप, इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत विद्यार्थ्यांना टॅबचे वाटप, ध्वज निधी संकलनात बीड जिल्हा राज्यात प्रथम आल्याने सत्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान सोहळाही या एकाच ठिकाणी उपमुख्यमंत्री पवार यांच्या उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमास सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार बजरंग सोनवणे, सर्वश्री आमदार विक्रम काळे, प्रकाश सोळंके, सुरेश धस, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, बीडच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रेमलता पारवे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत उपस्थित होते.

**प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत (ग्रामीण) 'सर्वांसाठी घरकुल' हे उद्दिष्ट गाठण्यासाठी बीड जिल्हा परिषदेने जुलै २०२५ पासून "दिवाळी नवीन घरकुलात' हा विशेष उपक्रम राबवला होता. या उपक्रमांतर्गत दिवाळीपर्यंत ५०,००० घरकुले पूर्ण करण्याचा ऐतिहासिक टप्पा जिल्ह्याने गाठला आहे. या यशामध्ये मोलाची कामगिरी करणाऱ्या ६ पंचायत समित्या, २ ग्रामपंचायती आणि गृहनिर्माण अभियंत्यांचा यावेळी विशेष गौरव करण्यात आला.**

श्री.पवार म्हणाले, नवीन इंग्रजी वर्षाच्या सर्वांना शुभेच्छा. येत्या नववर्षात आपणास बीडच्या विकासात अधिक भर घालायची आहे. या वर्षाच्या सुरूवातीलाच 1363 विकासकामांनी सुरूवात झाली आहे, ही आनंदाची बाब आहे. बीड जिल्ह्यात एकाच वेळेस एवढ्या विकासकामांचे भूमिपूजन आणि उद्घाटन होत आहेत, त्यामध्ये आपणा सर्वांची साथ असल्याचेही ते म्हणाले. जिल्हा परिषद, जिल्हा सैनिक कार्यालय व इतर कार्यालयांच्या माध्यमातून जिल्ह्यात चांगले काम होत आहे. त्याला जनतेचीही साथ आहे, त्यामुळे येथील जनतेला जनतेला धन्यवाद देतो, असेही पवार म्हणाले. यासह त्यांनी जिल्ह्यात देण्यात आलेल्या भरीव निधीबाबत सविस्तर माहिती दिली. यामध्ये त्यांनी बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या नूतनीकरणासाठी निधी सह शासन मान्यता दिल्याचे आवर्जून सांगितले.



### सहकारी चळवळीला अधिक गतिमान करण्यावर भर

■ राज्यपातळीवरील सहकार विभागाचे काम उत्तम आहे. राज्याने सहकार क्षेत्रात भरीव काम केले आहे, या सहकाराच्या माध्यमातून राज्याची ओळख जगभर आहे. येणाऱ्या काळामध्ये तरुणांच्या हाताला काम, महिलांचे सक्षमीकरण सहकार क्षेत्रातून मोठ्याप्रमाणात करण्यात येणार आहे. सहकारी चळवळीला अधिक गतिमान करण्यावर शासनाचा भर आहे. बीड जिल्ह्यामध्ये सहकार भवनाची आवश्यकता होती, म्हणून 14 कोटी 98 लाख एवढ्या रकमेचे सहकार संकुल याठिकाणी उभे राहत आहे, ही आनंदाची बाब असल्याचे सांगत सहकार विभागाशी संबंधित १० कार्यालये एकाच ठिकाणी या संकुलामध्ये राहतील.

**- बाबासाहेब पाटील, सहकार मंत्री**

# जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्याकडून कृषी विभागाच्या विविध योजनांचा आढावा

हिंगोली (प्रतिनिधी) जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज जिल्ह्यातील कृषी विभागाच्या विविध योजनांचा सविस्तर आढावा घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात त्यांच्या अध्यक्षतेखाली कृषी विभागाची जिल्हास्तरीय आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम, जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी अतुल वायसे, उपविभागीय कृषी अधिकारी प्रदीप कच्छवे, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक सुजीत झोडगे, सर्व तालुका कृषी अधिकारी, विमा प्रतिनिधी तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी गुप्ता यांनी जिल्ह्यातील सोयाबीन, हळद व इतर पिकांच्या उत्पादनासाठी प्रती हेक्टर येणाऱ्या खर्चाबाबत चर्चा केली. तसेच नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) टप्पा-2 अंतर्गत जिल्ह्यातील 148 गावांमध्ये योजना राबविण्यात येणार असून त्यासाठी गावनिहाय हवामान अनुकूल आराखडा तयार करण्यात आला असल्याचे सांगितले. हा प्रकल्प तीन घटकांमध्ये राबविण्यात येत असून योजनेसाठी आतापर्यंत 7 हजार 89 अर्ज प्राप्त झाले आहेत. या योजनेअंतर्गत वैयक्तिक शेततळे, शेततळे अस्तरीकरण, वृक्ष व बांबू लागवड, गांडूळ खत युनिट, पाईप व पंप संच, शेडनेट गृहातील लागवड साहित्य, रेशीम उद्योग, मत्स्यपालन, शेळीपालन, मृद व जलसंधारण तसेच एनआरएम अंतर्गत विविध कामांचा समावेश आहे. ही कामे करताना प्रत्येक कामाचे जिओ टॅगिंग फोटो व युनिक आयडी तयार करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी गुप्ता यांनी दिल्या.

यावेळी रब्बी पेरणी, गतवर्षीच्या पीक विमा वाटपाची सद्यस्थिती, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, ॲग्रीस्टॅक योजना, कडधान्य व पौष्टिक तृणधान्य योजना, एकात्मिक फलोत्पादन विकास, मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना, वैयक्तिक शेततळे, स्मार्ट प्रकल्प, सूक्ष्म सिंचन तसेच गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान या योजनांचा आढावा घेण्यात आला. प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत विमा अनुदान वाटपाची स्थिती तपासून जिल्हाधिकारी गुप्ता यांनी संबंधित पीक विमा कंपनीने 15 जानेवारीपर्यंत विमा अनुदानाचे वाटप पूर्ण करावे, अन्यथा संबंधित कंपनीवर कारवाई करण्यात येईल, असे निर्देश दिले.

# कमी खर्चात अधिक सुविधा ; MSRTC ची नवी पास योजना ?



**मुंबई : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रवाशांच्या सोयीसाठी नवीन योजना काढली आहे. योजनेनुसार ई- बस सेवेचा वापर वाढवण्यासाठी नवीन मासिक आणि त्रेमासिक पास योजना सुरू केली आहे. या योजनेचा मुख्य हेतु असा आहे की दररोज एकाच मार्गवर नोकरी , व्यवसाय अथवा शिक्षणासाठी प्रवास करणाऱ्या नियमित प्रवाशांना कमी खर्चात अधिक सुविधा देणे हा आहे. या पास योजनेमुळे ई-बस सेवा अधिक किफायतशीर ठरणार असून प्रवाशांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाचणार आहेत.**

एसटी महामंडळाचे अध्यक्ष आणि राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की खासगी वाहनांचा वापर कमी करून जास्तीत जास्त प्रवाशांनी ई-बसमधून प्रवास करावा,यासाठी ही योजना राबवण्यात येत आहे. रोजच्या प्रवाशांना ई-बसकडे आकर्षित करणे हा या योजनेचा प्रमुख हेतू आहे.

सध्या MSRTC च्या ई-बस प्रकल्पांतर्गत ४४८ ई-बस कार्यरत असून शिवाई प्रकल्पामध्ये आणखी ५० ई-बस सेवा देत आहेत. येत्या काही महिन्यांत या बसची संख्या टप्प्याटप्प्याने वाढवण्याचा मानस असल्याची माहिती सरनाईक यांनी दिली आहे. त्यामुळे भविष्यात अधिक मार्गांवर ई-बस सेवा सुरू होणार आहे.

या योजनेत मासिक आणि त्रैमासिक असे दोन प्रकारचे पास उपलब्ध आहेत. मासिक पासमध्ये ३० दिवसांचा प्रवास कालावधी असून केवळ २० दिवसांचे भाडे भरावे लागणार आहे. तर त्रैमासिक पासमध्ये ९० दिवसांचा कालावधी असून ६० दिवसांचे भाडे भरल्यास संपूर्ण ९० दिवस प्रवास करता येणार आहे.

शिववाणी

वीरशैव लिंगायत समाजातील बांधव / भगिनींनो...
पत्रकार व्हायचे आहे तर तात्काळ संपर्क साधा...

महाराष्ट्र शासनाच्या शासनमान्य जाहिरात यादीवर मागील 22 वर्षांपासून नियमित असलेले
साप्ताहिक शिववाणी हे वृत्तपत्र जानेवारी 2026 पासून वीरशैव लिंगायत समाजाचे मुखपत्र म्हणून समाजासाठी समर्पित करत आहोत...

या साप्ताहिकांमध्ये यापुढे वीरशैव लिंगायत समाजातील घडामोडींना प्राधान्य दिले जाईल. यासाठी तमाम महाराष्ट्रातील वीरशैव बांधव भगिनी यांना विनंती आहे की, जर आपल्याला पत्रकार व्हायचे असेल तरी सुवर्णसंधी साध्य करा.. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात, गाव पातळीवर तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहेत. या प्रतिनिधींनी आपल्या परिसरातील विविध मठ, त्या अंतर्गत असलेले कार्यक्रम, वीरशैव लिंगायत समाजाच्या विविध संघटना त्यांचे विविध कार्य, यासह वीरशैव लिंगायत समाजातील सामूहिक विवाह सोहळे, निधन वार्ता फोटोसहीत खालील व्हाट्सअप नंबर वर पाठवायच्या आहेत.

तत्पूर्वी आपली नियुक्ती निश्चित करण्यासाठी कृपया आपण आपले संपूर्ण नाव, रक्तगट, संपूर्ण पत्ता पिन कोड नंबर सहित मोबाईल नंबर,पासपोर्ट फोटो, तात्काळ खालील वॉट्स अप नंबर वर पाठवायचा आहे. ज्यांचे प्रथम अर्ज येतील त्यांना त्या जिल्ह्यातील प्रतिनिधी म्हणून नियुक्ती देण्यात येईल. कृपया फक्त वीरशैव लिंगायत समाजातील वृत्तपत्रात काम करणाऱ्या इच्छुकांनी तात्काळ वरील माहितीसह संपर्क साधावा ही विनंती..

श्री. वैभव जगदेवी विवेक स्वामी,
मुख्य संपादक
98 22 62 85 21

श्री. आनंद डोंगरे
कार्यकारी संपादक
98 81 2 5 72 47

संपादकीय

## नव्या वर्षात दडलंय काय ?

२०२५ हे वर्ष अनेक राजकीय आरोप-प्रत्यारोपांमुळे गाजलं. २०२६ मध्ये पश्चिम बंगाल, आसाम, केरळ, तामिळनाडू आणि पुदुचेरी या राज्यांमध्ये निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांच्या निकालांमुळे केवळ नवी राजकीय समीकरणेच उदयाला येणार नाहीत, तर राजकीय दशा आणि दिशाही बदलेल, असा दावा केला जात आहे.

२०२६ हे आशावादी आहे. अनेक जुन्या प्रश्नांची उत्तरे देणार. काही महत्त्वाच्या घडामोडींना चिन्हांकित करणार. देशातील राजकारण आणि प्रशासनाला आकार देऊ शकतात. नवे वर्ष हे सत्ताधारी भाजप आणि प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेससह अनेक पक्षांसाठी महत्त्वाचे ठरणार. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर भाजपने पुन्हा एकदा पकड बसवली. झारखंड वगळता दिल्ली, हरियाणा, महाराष्ट्र आणि बिहारसह अनेक राज्यांतील विधानसभा निवडणुकीत भाजपने विजय मिळवला. त्यामुळे भाजपची वाटचाल अगदी जोमात सुरू आहे. लोकांना मोदी जे बोलतात ते पटले आहे. जम्मू आणि काश्मीरमध्ये भाजपने चांगली कामगिरी केली असली तरीही तेथे भाजपची कामगिरी नाही. तेथे नॅशनल कॉन्फरन्सच्या कुबड्या पक्षाला हाती घ्याव्या लागल्या आहेत. पण जम्मूमध्ये पक्षाची कामगिरी चांगली आहे. असे असले तरीही १५ जानेवारी रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुका या भाजपसाठी खऱ्या अर्थाने परीक्षाच आहेत. यात भाजपचा खरा कस लागणार आहे. कारण आता उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे बंधू एकत्र आले आहेत. जरी राज यांनी मुंबई महापालिकांपुरती ही युती असल्याचे जाहीर केले असले तरीही भाजपला यापासून सावध राहावे लागेल. मुंबई महापालिका ही महाराष्ट्रातील सर्वात मोठी नव्हे तर आर्थिकदृष्ट्या सर्वात शक्तिशाली पालिका आहे. त्यामुळे तेथे जो कुणी विजय मिळवेल तेथे त्याचा राज्यभर डंका चालेल. म्हणून तर उद्धव ठाकरे यांचा मुंबईसाठी आटापिटा चालू आहे. एकट्या मुंबई पालिकेचे बजेट आहे ३१ हजार कोटी रुपयांचे. यावरून मुबई पालिकेच्या विशाल आकाराचा अंदाज यावा.

भारतातील सर्वात श्रीमंत पालिकेचे नियंत्रण केवळ प्रशासकीय शक्तीच नव्हे तर त्याचे प्रतीकात्मक मूल्य प्रचंड आहे. मुंबई महापालिका निवडणुकीनंतर देशात होतील त्या प. बंगाल, आसाम, पुदुचेरी आणि केरळ तसेच तामिळनाडू या राज्यांच्या विधानसभा निवडणुका. येथे भाजप फारसा ताकदवान नाही पण तेथे तो चमत्कार घडवू शकतो. यात प. बंगालची निवडणूक भाजपसाठी महत्त्वाची आहे आणि तितकीच अवघड आहे. कारण येथे भाजपला बंगालमधील राजकीय ध्रुवीकरणाचा लाभ होत नाही. प. बंगालमध्ये सर्वात लक्षवेधी लढती होणार आहे. तामिळनाडूचे राजकीय परिदृष्य पारंपरिकपणे द्विपक्षीय राहिले आहे. तेथे द्रमुक आणि अण्णा द्रमुक याच दोन पक्षांची सरकारे आलटून पालटून राहिली. जो कुणी सत्तेवर असतो तो विरोधी पक्षाच्या नेत्यांना तुरुंगात टाकण्याचा प्रयत्न करतो. हेच तेथे सातत्याने चालत आले आहे. सत्ताधारी द्रमुकची या भागावर चांगलीच पकड आहे आणि आता तर विभाजित अण्णा द्रमुकमुळे तेथे द्रमुकची पकड आणखी मजबूत झाली आहे. भाजपचा यात फासा कुठेही बोलबाला नाही. केवळ तुलनेने दुर्बल पक्षाला तो हात देऊ शकतो. पण यापेक्षा काही नाही. आसामात मात्र तुलनेने निवडणूक सोपी आहे. कारण तेथील ध्रुवीकरणाचे नेतृत्व भाजपच्या लाभासाठी काम करत आहे. त्यामुळे तेथे विजय सोपा आहे. शिवाय तेथे भाजपने मदरशाना अनुदान बंद केले असून तेथे हिंदूंची शक्ती उभी केली आहे, तिचा भाजपला लाभ होईल. सर्वात महत्त्वाच्या आणि भाजपसाठी अत्यंत अवघड निवडणुका असतील त्या केरळच्या.

केरळमध्ये भाजपला कधीही यश मिळाले नाही. तेथील डावी लोकशाही आघाडी आणि काँग्रेस यांनी भाजपला चंचुप्रवेश करू दिला नाही. पण एक भाजपसाठी आशादायक चिन्ह आहे. कारण केरळातील ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या त्यात डाव्या लोकशाही आघाडीला धक्का बसला. येत्या निवडणुकात भाजपचा बेत येथे दोन अंकी जागा मिळवण्याचा आहे आणि असे झाले तर भाजपचा तो खूप मोठा विजय ठरेल. या निवडणुकीत डाव्या लोकशाही आघाडीचा पराभव झाल्यास प्रथमच कम्युनिस्टांचा मुख्यमंत्री राहणार नाही. केरळच्या राजकारणात भाजप आपला ठसा उमटवू पाहत आहे. काँग्रेस आणि डावे पक्ष हे प्रमुख घटक पक्ष असल्याने इंडिया गटातील अंतर्गत समीकरणे यामुळे बदलतील असे चित्र दिसू शकते. पण हे झाले राजकीय चित्राचे गणित. पण २०२६ च्या निवडणुकाआधी भाजपचे नेते अमित शहा यांनी भाजप नेत्यांना तळागाळातील नेत्यांना आवाहन करून त्यांना आणखी मजबूत करण्याचे आवाहन केले. आसाममध्ये सत्ता मिळवणे भाजपला अवघड जाऊ नये. गौरव गोगोई यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसकडून जबरदस्त लढत मिळाली तर भाजपला ही लढत वाटते तितकी सोपी जाणार नाही हे नक्की. काँग्रेससाठीही येणारे वर्ष कमी आव्हानात्मक असणार नाही. कारण आसाममध्ये परतीकडे आस लावून बसलेली काँग्रेस बंगालमध्ये जवळपास संपल्यात जमा आहे. काँग्रेसच्या साऱ्या आशा केरळवर एकवटल्या होत्या, पण तेथेही स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत भाजपने बाजी मारून काँग्रेसला पुन्हा एकदा निराशेचे पाणी पाजले. अर्थात काँग्रेसचे स्थानिक नेतृत्वातील वाद आणि संघर्ष यास काही प्रमाणात कारण आहेच. बंगालमध्ये तृणमूल भाजपला सहज विजयाप्रत नेईल असे चित्र आहे. पण याची कल्पना निकाल लागल्यावरच येईल. या राज्यातील निवडणुकांचा निकाल लागल्यावरच हे वर्ष कसे जाईल हे सांगता येईल. अण्णा द्रमुकमध्ये आपसातील संघर्षामुळे स्टॅलिनय यांचे काम सोपे झाले. तसेच बहुतक ठिकाणी आहे.

# भविष्यवेत्त्यांच्या नजरेतून २०२६

**भविष्यामध्ये काय घडेल याचे कुतूहल, भीती, चिंता आणि भय प्रत्येकाला असते. त्यामुळेच भविष्याची काळजी करतो. ही जगभरातील मानवजातीची कथा आहे. त्यामुळेच भविष्यवेत्त्यांचे २०२६ बाबत काय संकेत मिळतात, पाहू या.**

२०२५ची अखेर आणि २०२६ ची सुरुवात कालचक्र नव्या वळणावर नेणारी आहे. भविष्याच्या कुशीत काय दडले आहे, याबद्दल जाणून घेण्याची, आडाखे बांधण्याची तसेच अंदाज व्यक्त करण्याची मानवी भावना काही नवी नाही. भविष्याविषयी जाणून घेण्यासंदर्भात प्रसिद्ध असणाऱ्या काही अभ्यासशाखाही आपण जाणतो. यातील तज्ज्ञ, अभ्यासू वा भाकीत वर्तवण्याची 'शक्ती' असलेले काही लोक हे काम दरवर्षी करतच असतात. असे असताना नववर्षात पाऊल ठेवताना आपणही भविष्याची चाचपणी करायला काय हरकत आहे? चला तर, २०२६ या वर्षाबद्दल भविष्यसूचक स्फटिकाचा गोळा काय म्हणतो, हे जाणून घेऊ या. जगातील महत्त्वाच्या भविष्यवाण्यांमध्ये प्रसिद्ध फ्रेंच भविष्यवेत्ता नॉस्ट्राडेमस यांच्या भाकितांचा अग्रक्रमाने समावेश होतो. म्हणूनच त्यांच्या भविष्यवाण्यांचे विविध प्रकारे अर्थ लावले गेले आहेत. त्याने सूचित केलेल्या घटनांमध्ये दोन महायुद्धे, हिरोशिमा आणि नागासाकीवर केले गेलेले अणुबॉम्बस्फोट तसेच अमेरिकेतील ९/११ चा दहशतवादी हल्ला यांचा समावेश होता. या सर्व भविष्यवाण्या १५५५ मध्ये लिहिल्या गेल्या होत्या. लेखनाच्या संकेतात्मक भाषेतून त्याचे विविध अर्थ निघू शकतात आणि त्यामुळेच इतिहासकार अनेकदा त्यांच्या भविष्यवाण्यांच्या विश्वासार्हतेवर वादही घालतात. या पार्श्वभूमीवर बघायचे तर २०२६ साठीच्या नॉस्ट्राडेमसच्या भविष्यवाण्याही जागतिक पातळीवर लक्षणीय अशांतता दर्शवतात.

काही अभ्यासकांतर्फे असेही सूचित होते की, पुढील काळात हवामान आपत्ती आणि तांत्रिक बदल मोठ्या प्रमाणात बघायला मिळतील. दुसरीकडे, बाबा वांगा या एका आदरणीय बल्गेरियन भविष्यवेत्त्याने भूकंप, ज्वालामुखीचा उद्रेक आणि तीव्र हवामान बदल यासारख्या महत्त्वाच्या आपत्तींबद्दलच्या भाकितांनिशी हे वर्ष कसे असेल, याचा प्राथमिक अंदाज दिला आहे. यंदा अशा पर्यावरणीय बदलांमुळे जगातील अनेक भागांमध्ये पूर, त्सुनामी आणि इतर अत्यंत गंभीर घटना घडू शकतात आणि त्यामुळे जगभरातील काही प्रदेश आणि क्षेत्रांवर विपरित परिणाम होऊ शकतो, असे सूचित करण्यात आले आहे. २०२६ मध्ये इथिओपिया, अमेरिका, म्यानमार, दक्षिण सुदान, गांबिया, सुदान, रशिया, झांबिया, दक्षिण आफ्रिका आणि थायलंड या देशांमध्ये सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. असे असताना जगभरातील प्रत्येक शंभर लोकांपैकी अंदाजे सात ते




आठ लोक निवडणुकीशी संबंधीत विपरित घटनांमुळे प्रभावित होऊ शकतात, असे दर्शवण्यात आले आहे. यंदा देशात पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू, आसाम आणि पुद्दुचेरीमध्ये विधानसभा निवडणुकांची तयारी असणार आहे. पश्चिम बंगालमध्ये भारतीय जनता पक्ष तृणमूल काँग्रेसच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना आव्हान देत आहे. तामिळनाडूमध्ये अण्णा द्रमुक-भाजप युती द्रमुकला सत्तेवरून हाकलून लावण्याचा प्रयत्न करत आहे. केरळमध्ये भाजप सातत्याने ताकद वाढवत असला तरी डावी लोकशाही आघाडी (एलडीएफ) आणि संयुक्त लोकशाही आघाडीमध्येच खरी लढत होईल. आसाममध्ये सध्या भाजप सत्तेत असले तरी आगामी निवडणुकांमध्ये राज्यात प्रभाव टिकवून ठेवण्यासाठी त्यांना प्रयत्न करावे लागतील.

जगाचा विचार करता सध्या जागतिक अर्थव्यवस्था मंदावली आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास जिंकण्यासाठी अर्थजगताला जोरदार प्रयत्न करावा लागेल. कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये गुंतवणूक केल्याने परिस्थिती सुधारण्यास मदत होईल. मात्र भाकीतांचा अंदाज घेता वेगवेगळी आर्थिक धोरणे आणि उच्च सार्वजनिक कर्जाचे निरीक्षण करणे महत्त्वाचे ठरणार आहे. आताच रशिया आणि चीन संसाधनांसाठी स्पर्धा करत आहेत. येत्या काळात त्यांच्यामधील संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता भविष्यवेत्ते दर्शवतात. सध्याची स्थिती तरी या इशाऱ्यांशी सुसंगत आहे. बल्गेरियन भविष्यवेत्ता बाबा वांगा यांनी देखील आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला आहे. २०२६ मध्ये येणारी अपेक्षित मंदी व्यापार तणाव आणि लोकसंख्याशास्त्रीय बदलांमुळे, विशेषतः विकसित देशांमध्ये वाढत असलेल्या वृद्धांच्या लोकसंख्येमुळे गडद होण्याची शक्यता आहे. 'गोल्डमन सॅक्स रिसर्च'चा अंदाज आहे की, २०२६ मध्ये बहुतेक प्रमुख अर्थव्यवस्था पूर्वीच्या अपेक्षेपेक्षा वेगाने वाढतील. जागतिक व्यापार शुल्कांमधील धक्क्यांमुळे आणि देशांतर्गत धोरणांमुळे २०२६ आणि त्यानंतरच्या आर्थिक वर्षासाठी भारताचा आर्थिक दृष्टिकोन प्रभावित राहण्याचा अंदाज आहे. २०४७ पर्यंत विकसित देशाचा दर्जा मिळवण्यासाठी सरकारला देशांतर्गत उत्पादनवाढीला चालना देणे, परकीय गुंतवणूक वाढवणे आणि जागतिक बाजारपेठांमध्ये व्यापार वाढवणे गरजेचे ठरेल. भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. २०२६ मध्ये भारताचे परराष्ट्र धोरण शेजारी राष्ट्रांशी जुळवून घेण्याच्या उपक्रमांवर भर देणारे राहील. त्याचबरोबर देश संरक्षण आणि आर्थिक सहकार्य वाढवून 'क्वाड'द्वारे अमेरिका आणि युरोप, विशेषतः जर्मनीसोबत आपली धोरणात्मक भागीदारी मजबूत करेल. थोडक्यात, भारताचे २०२६ चे परराष्ट्र धोरण दृढनिश्चयी असणार असून विविध देशांशी मजबूत भागीदारी निर्माण करणे, जागतिक नेतृत्वक्षमता वाढवणे आणि जटिल भू-राजकीय परिस्थितीत राष्ट्रीय विकास सुनिश्चित करणे हे असेल.

# महिलांविषयक सुधारणांत अजूनही अडथळेच !

**बदलत्या काळासरशी महिलाविषयक प्रश्नांचे स्वरूप आणि गांभीर्यही बदलत आहे. हे प्रश्न अधिकाधिक जटिल होत असून चार भिंतींबरोबरच समाजातही स्त्री सुरक्षित नसल्याचे चित्र आता नवीन राहिलेले नाही. खरेतर तिच्या सर्व प्रकारच्या संरक्षणासाठी कायद्यांची कमतरता नाही. मात्र हे कायदे सर्वांपर्यंत पोहोचत नाहीत, अनेक शक्ती त्याच्या अंमलबजावणीमध्ये खोडा घालण्याचा, दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करतात आणि अंतिमत: स्त्री संरक्षणार्थ उभी केलेली ही यंत्रणा तोकडी पडते हेच चित्र २०२५ मधील काही घटनांनी दाखवून दिले आहे.**

मी ग्रामीण भागामध्ये काम करते. याच भागात राहते. रोजच्या अनुभवातून आजच्या काळात स्त्रियांकडे बघण्याचा लोकांचा दृष्टिकोन, येथील महिलांचे जीवनमान-जीवनशैली फारशी बदललेली नसल्याचे तीव्रतेने जाणवते. म्हणूनच समाजातील स्त्रियांचा दर्जा सुधारला असल्याचे विधान ढोबळमानानेही करावेसे वाटत नाही. ग्रामीण, आदिवासी, दुर्गम भागामधील महिलाविषयक प्रश्नांमध्ये फारसा फरक दिसत नसल्याचे खेदाने नमूद करावेसे वाटते. वानगीदाखल अगदी अलीकडचा व्याख्यान देते वेळी अनुभवलेला एक प्रसंग सांगते. माझे बोलणे संपल्यावर एक तरुण उभा राहिला. त्याला आजूबाजूच्या लोकांनी खुणा करून बोलण्यास उभे केल्याचे दिसत होते. त्याच्या प्रश्नाचा रोख बायकांचेच इतके लाड का होतात, त्यांच्यासाठीच इतके कायदे का आहेत, कोर्टातही त्यांचीच बाजू का घेतली जाते, त्यांना प्राधान्यक्रम का दिला जातो अशा तक्रारवजा बोलण्याकडे होता. त्याच्या या चौकशीत सहजता वा कुतूहल नसून असुया, राग आणि देहबोलीतून विद्वेष व्यक्त होत होता. ही छोटीशी घटना बोलकी म्हणावी लागेल, कारण तो विचारणारा एकटा असला तरी भोवती बसलेल्या गटाचे अनुमोदनही लपत नव्हते. थोडक्यात, या सामाजिक मानसिकतेनिशी आपण २०२६ मध्ये म्हणजेच तथाकथिक प्रगत आणि आधुनिक युगात प्रवेश करत आहोत, हे विसरता कामा नये. संविधानाच्या कलम १४, १५ वा २५ मध्ये प्रत्येक भारतीय नागरिकाला



समान न्याय असल्याचे सूचित केले आहे. जात, धर्म, लग, पंथ असा भेदभाव न करता घटनेने प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला आहे. मात्र समाजाची मानसिकता त्याला अनुकूल नाही. मध्यंतरीच आदिवासी भागातील एक कुटुंब तक्रार घेऊन आले होते. जमिनीच्या मोठ्या खटल्यासाठी साक्षीदार म्हणून मी त्यांच्या पत्नीला बोलवायला सांगितले. तेव्हा माझ्याच ऑफिसमध्ये बसून ते महाशय म्हणाले, 'मॅडम, कशाला तिला बोलवायचे? ती काय बोलणार? बाईची अक्कल चुलीजवळ...!' थोडक्यात, आजही ७५ टक्के लोकांमध्ये ही मानसिकता आहे. ग्रामीण भागात ही टक्केवारी आणखी वाढते. याचे दाखले अनेक प्रकरणांमधून दररोज मिळत असतात. त्यातीलच एक म्हणजे, सून नांदत नसल्याची तक्रार घेऊन एक बाई आमच्याकडे आली आणि बोलण्याच्या ओघात सुनेचे चुकले तर मुलगा दोन-चार चापटी मारतो, असे सहज म्हणाली. पोरीच्या जातीने नवऱ्याचे एवढे तर सहन केलेच पाहिजे, असे म्हणत तिने तक्रारीचा पाढा तसाच सुरू ठेवला. अर्थातच ती बाई स्वतःच्या तोंडाने एका महिलेची तक्रार करत असली तरी तिचा आवाज पुरुषी वर्चस्वाने, दबावाने आणि वर्षानुवर्षांच्या पुरुषप्रधान संस्कृतीने घडवलेला होता. अशी एक ना अनेक उदाहरणे देता येतील. अशा मानसिकतेमुळेच सुरूवातीला उल्लेख केलेल्या घटना घडतात आणि अनेक कोवळ्या कळ्या उमलण्यापूर्वीच कोमेजून जातात. २०२५ मध्येही हे चित्र बदललेले नाही. आपल्याला वाढत्या बालविवाहांचा प्रश्नही अद्यापी तडीस लावता आलेला नाही. या प्रश्नाकडे आजही हव्या त्या गांभीर्याने पाहिले जात नाही. लहान मुलांवरील लैंगिक अत्याचाराविरोधात 'पोस्को'सारखा कठोर कायदा आहे. मात्र बालविवाह हा समाजमान्य बलात्कार आहे, हे अजून समाजाला पटलेले नाही. विशेषतः भटक्या समाजामध्ये काही विशिष्ट वर्गामध्ये आजही आठ-नऊ वर्षांच्या मुली आणि १३-१४ वर्षांच्या मुलांची लग्नं लावली जातात. आमच्याकडे आठवड्यातून एकदा तरी अशी एखादी तक्रार येतेच येते. अर्थातच यामध्ये लैंगिक अत्याचार, लैंगिक शोषण मोठ्या प्रमाणावर होते. लहान वयातच लग्न लावून दिलेल्या मुला-मुलींचे शिक्षण थांबते. त्यांना बालमजूर म्हणून कामाला जावे लागते. अशांमध्ये आरोग्याचे असंख्य प्रश्न निर्माण होतात. वस्तूतः आपल्याकडे बालविवाह थांबवणारा कायदा आहे. पण त्याची अंमलबजावणी हव्या त्या गांभीर्याने होताना दिसत नाही. पूर्वीपेक्षा थोडा फरक घडत असला तरी सुधारणा अत्यंत मंद गतीने होत आहे, हेदेखील विचारात घ्यावे लागेल. पूर्वी बालविवाह थांबवत असताना आम्हाला काही पत्रकारांचेच फोन यायचे आणि कशाला मध्ये पडता, असे म्हणत शहाणपण शिकवले जायचे. काही वेळा तर शासकीय अधिकारीही वेगवेगळ्या विचारणा करून भंडावून सोडायचे. आम्हालाच लेखी तक्रार देण्यास सांगायचे. आता या मानसिकतेत थोडा बदल होत आहे. पण तरीही कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीपासून आपण दूर आहोत, हे लक्षात घ्यावे लागेल. कार्यस्थळी होणाऱ्या लैंगिक शोषणाचा प्रश्नही बराच गंभीर आहे. २०१३ मध्ये यासंबंधीचा कायदा पारित करण्यात आला. तो अत्यंत चांगला असून याद्वारे कोणत्याही कार्यस्थळी अशा घटनांची, तक्रारींची दखल घेणारी एक समिती असावी, असे निर्देशित करण्यात आले आहे. दहापेक्षा जास्त कर्मचारीवर्ग असणाऱ्या कार्यालयांसाठी ही बाब अनिवार्य आहे. मात्र आजही अनेक ठिकाणी अशी कोणतीही समिती दिसत नाही. दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे घरगुती कामे करणाऱ्या महिलांचे कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण होत असेल तर त्यांना थेट कलेक्टरच्या अध्यक्षतेखाली असणाऱ्या समितीकडे तक्रार करावी लागते. मात्र दूरच्या भागात काम करणाऱ्या महिलेचे कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण झाल्यास तिने इतके दूर कसे जायचे, हा प्रश्न उरतो. कारण, कधी कधी हे अंतर शंभर किलोमीटर वा त्यापेक्षा अधिकही असू शकते. हीदेखील कायद्यातील मोठी त्रुटी वाटते. महिलांना स्थानिक ठिकाणीच त्वरित आणि योग्य न्याय मिळायला हवा. चौकशी, साक्षीपुरावे, सुनावणी यासाठी पीडितेने इतका प्रवास करणे, वेळ व पैसा खर्च करणे योग्य वाटत नाही. म्हणूनच तातडीने ही सुधारणा होणे गरजेचे वाटते. नवीन कायदे करण्यापेक्षा महिलांच्या संदर्भातील कायद्यातील अशा छोट्या मोठ्या त्रुटी दूर केल्या तरी खूप काही साधले जाईल, असे वाटते. वकील म्हणून काम करताना अशा अनेक बाबी जाणवतात आणि खटकतात. काही खटल्यांमध्ये मुख्य निकाल येईपर्यंत न्यायालय पीडित स्त्रीच्या चरितार्थासाठी, सुरक्षेसाठी अंतरिम आदेश देते. कायद्यानुसार चार भिंतीमध्ये आई, मुलगी, बायको, बहीण अशा कोणत्याही नात्याने एखाद्या पुरुषाबरोबर राहणारी स्त्री त्याने मानसिक, आर्थिक, शारीरिक छळ केल्यास न्यायालयात दाद मागू शकते. अशा परिस्थितीत घराबाहेर काढली गेलेली आई घराचा हिस्सा मागू शकते, पत्नी निवारा वा खर्च मागू शकते. या महिला संरक्षण वा मुलांची कस्टडी मागू शकतात.

हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स अ‍ॅण्ड पब्लिशर्स, मोंढा रोड, बीड जि. बीड-४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : घर नं. १०२, छत्रपती कॉलनी, क्रांती नगर, तहसीलच्या मागे, बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत).

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT INDRADHANUSHYA PRINTERS & PUBLISHERS, MONDHA ROAD, BEED, DIST.HEED-431122 AND PUBLISHED AT H.NO.102, CHATRAPATI COLONY, KRANTI NAGAR, TAHASIL BACKSIDE, BEED-431122 (MAHARASHTRA) (JURISDICTION AT BEED)

# राज्यात रस्ता अपघातांतील मृत्युदरात गतवर्षी झाली घट

## परिवहन विभागाच्या उपाययोजनांना यश

मुंबई (प्रतिनिधी) महाराष्ट्र राज्यात रस्ता सुरक्षेसाठी परिवहन विभागामार्फत सातत्याने राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांचा सकारात्मक परिणाम दिसून येत असून, नोव्हेंबर २०२५ पर्यंतच्या आकडेवारीनुसार राज्यातील रस्ता अपघातांमधील मृत्युदरात घट नोंदविण्यात आली आहे.

जानेवारी ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत राज्यात एकूण ३३,००२ अपघात झाले असून, त्यामध्ये १४,०६६ अपघाती मृत्यू झाले आहेत. मागील वर्षी याच कालावधीत ३२,७८४ अपघातांत १४,१८५ मृत्यू झाले होते. तुलनात्मक पाहता, अपघातांची संख्या २१८ ने (०.६६ टक्के) वाढली असली तरी अपघाती मृत्यूंची संख्या ११९ ने म्हणजेच ०.८३ टक्क्यांनी घटली आहे. मृत्युदरातील ही घट रस्ता सुरक्षा उपाययोजनांचे यश दाखवते. रस्ता सुरक्षा उपायांमुळे काही जिल्ह्यांमध्ये मृत्यूंच्या संख्येत विशेष घट दिसून आली आहे. नागपूर शहरात २१ टक्के, पालघरमध्ये २० टक्के, अमरावतीत १७ टक्के, पुण्यात १५ टक्के, धुळ्यात १४ टक्के तर छत्रपती संभाजीनगरमध्ये १२ टक्क्यांनी अपघाती मृत्यू कमी झाले आहेत, असे परिवहन विभागाने कळविले आहे.



### १८ टक्के घट झाल्याची नोंद

दरम्यान, मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरही अपघाती मृत्यूंमध्ये मोठी घट नोंदविण्यात आली आहे. जानेवारी ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत या मार्गावर ८२ अपघाती मृत्यू झाले होते, तर २०२५ मध्ये ही संख्या ६१ वर आली आहे. म्हणजेच २१ मृत्यूंनी (२६ टक्के) घट झाली आहे. तसेच अपघातांची संख्या ६६ वरून ५४ इतकी कमी झाली असून, त्यामध्ये १८ टक्के घट नोंदविण्यात आली आहे.

### नागरिकांनी वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळावेत

राज्यातील रस्ता अपघातांची संख्या सन २०३० पर्यंत ५० टक्क्यांनी कमी करण्याचे उद्दिष्ट परिवहन विभागाने निश्चित केले असून, त्यासाठी भविष्यात रस्ता सुरक्षा उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहेत. याचबरोबर, राज्यातील सर्व वाहनचालक व पादचारी नागरिकांनी वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळावेत, असे आवाहनही परिवहन विभागामार्फत करण्यात आले आहे.

# रत्नापिंप्री ग्रामपंचायतीला गटविकास अधिकाऱ्यांची भेट

**पारोळा (प्रतिनिधी) तालुक्यातील रत्नापिंप्री येथे मुख्यमंत्री समृद्धी पंचायत अभियान अंतर्गत गटविकास अधिकारी भूषण कदम यांनी आढावा पाहणी करण्याकरता अचानक रत्नापिंप्री ग्रुप ग्रामपंचायत तिला भेट दिली. यावेळी विस्तार अधिकारी संजीव सैंदाणे, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक शुभम सपकाळे, तालुका व्यवस्थापक गणेश पाटील उपस्थित होते.**

**मुख्यमंत्री समृद्धी पंचायत अभियानांतर्गत पाहणी**

यावेळी ग्रामपंचायतीत मुख्यमंत्री समृद्धी पंचायत अभियान अंतर्गत होणाऱ्या वसुलीची आणि गावात होणाऱ्या जलतारा विविध विकासकामे यासंदर्भात विचारपूस करीत पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. वर्षाच्या शेवटच्या दिवस असल्या मुळे अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत देखील भेट दिली. या भेटीत शाळेत विशेष विचारपूस आणि शाळेची इमारतीसह इतर शैक्षणिक तसेच आवाराची पाहणी केली. विद्यार्थ्यांना दिला जाणारा पोषण आहार यात विशेष म्हणजे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांना वरण-भात शिरा आणि भजी हा खास मेनू तयार करण्यात आला होता. याप्रसंगी पोषण आहार वाटपाच्या वेळेस मान्यवरांनी हजेरी लावली आणि अधिकाऱ्यांनी देखील या मेनूचा आस्वाद घेतला. शाळेच्या कामकाजा विषयी समाधान व्यक्त केले. शाळेच्या मुख्याध्यापिका लीना पवार, सुरेखा पाटील शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष अधिकार पाटील, तसेच ग्रुप ग्रामपंचायतीचे पदाधिकारी गावातील ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी विस्तार अधिकारी संजीव सैंदाणे, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक शुभम सपकाळे, तालुका व्यवस्थापक गणेश पाटील, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.



**प्रवेशिका व पुस्तके पाठविण्याचे आवाहन**

# स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार

मुंबई (प्रतिनिधी) मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीसाठी प्रकाशन वर्ष २०२५ करिता राज्य शासनाच्यावतीने देण्यात येणाऱ्या स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांसाठीच्या प्रवेशिका जिल्हाधिकारी कार्यालयात (मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळून), तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयात दिनांक १ जानेवारी, २०२६ ते ३० जानेवारी २०२६ पर्यंत पाठविता येणार आहेत. दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ३१ डिसेंबर, २०२५ या कालावधीत प्रकाशित झालेली प्रथम आवृत्ती पुस्तके या स्पर्धेसाठी पात्र आहेत.

लेखक / प्रकाशक या स्पर्धेसाठी प्रवेशिका दाखल करु शकतात. मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यातील लेखक / प्रकाशकांनी पुस्तकांच्या दोन प्रतींसह विहित नमुन्यातील प्रवेशिका सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५ येथे पाठवाव्यात. मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळून अन्य ठिकाणच्या लेखक / प्रकाशकांनी संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये हे साहित्य दिनांक १ जानेवारी, २०२६ ते ३० जानेवारी २०२६ या विहित कालावधीत पाठवावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. लेखक / प्रकाशकांनी मंडळाकडे प्रवेशिका व पुस्तके पाठविताना सदर बंद लिफाफ्यावर / पाकीटावर 'स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०२५ साठी प्रवेशिका' असा स्पष्ट उल्लेख करावा.

- महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर 'नवीन संदेश' या सदरात 'स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०२५ नियमावली व प्रवेशिका' या शीर्षाखाली व 'What's new' या सदरात 'Late Yashwantrao Chavan State Literature Award २०२५ Rules Book and Application Form' या शीर्षाखाली व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या http://sahitya.marathi.gov.in या संकेतस्थळावर प्रवेशिका व नियमपुस्तिका उपलब्ध होतील, प्रवेशिका पूर्णतः भरुन आवश्यक साहित्यासह सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयात दिनांक १ जानेवारी, २०२६ ते ३० जानेवारी २०२६ या विहित कालावधीत पोहचतील अशा बेताने पाठवाव्यात.
- विहित कालमर्यादेनंतर (१ जानेवारी, २०२६ ते ३० जानेवारी २०२६) येणाऱ्या प्रवेशिका स्पर्धेसाठी स्वीकारल्या जाणार नाहीत, असे सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांनी कळविले आहे. प्रवेशिका व पुस्तके स्वीकारण्याचा अंतिम दिनांक ३० जानेवारी, २०२६ हा राहील.
- या स्पर्धेची नियमावली व प्रवेशिका सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर इमारत्त, दुसरा मजला, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५ यांच्या कार्यालयात तसेच मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता अन्यत्र संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात (सर्वसाधारण शाखा अथवा करमणूक शाखा) विनामूल्य उपलब्ध होतील.

## तपस्वी शिल्पकार डॉ. राम सुतार काळाच्या पडद्याआड

मुंबई (प्रतिनिधी) शिल्पकला क्षेत्रावर आपले आणि महाराष्ट्राचे नाव कोरणारा तपस्वी शिल्पकार काळाच्या पडद्याआड गेला आहे, अशी शोकभावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पद्मश्री, महाराष्ट्रभूषण ज्येष्ठ शिल्पकार डॉ. राम सुतार यांना निधनाबद्दल भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांनी सुतार यांचे सुपुत्र अनिल सुतार यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून त्यांना सांत्वना दिली. मुख्यमंत्री शोकसंदेशात म्हणतात, रामभाऊंच्या निधनाने जागतिक कीर्तीचा कलाकार आपल्यातून निघून गेला. प्रमाणबद्धता आणि त्यातील जिवंतपणा हे त्यांच्या कलेचे वैशिष्टय होते.

# आपले सरकार सेवा केंद्रासाठी प्राप्त अर्जांची छाननी करण्यासाठी पथकांची नियुक्ती

**हिंगोली (प्रतिनिधी) जिल्ह्यातील रिक्त असलेल्या आपले सरकार सेवा केंद्रासाठी दि. 24 डिसेंबर, 2025 ते दि. 2 जानेवारी, 2026 या कालावधीत अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून पात्र व अपात्र उमेदवारांची यादी तयार करण्यासाठी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे.**

प्राप्त अर्जांची दि. 5 व 6 जानेवारी, 2026 रोजी छाननी करण्यात येणार असून ही कार्यवाही उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) केशव गड्डापोड व शिक्षणाधिकारी (मा.) संदीपकुमार सोनटक्के यांच्या नेतृत्वाखाली पार पडणार आहे. पथकात नियुक्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दि. 5 व 6 जानेवारी, 2026 रोजी जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून आपले सरकार सेवा केंद्रासाठी प्राप्त सर्व अर्जांची छाननी पूर्ण करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. अर्ज छाननी प्रक्रियेदरम्यान गोपनीयता बाळगणे अत्यावश्यक असून कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांनी छाननीच्या ठिकाणी मोबाईल फोन घेऊन जाण्यास मनाई करण्यात आली आहे.

तसेच अर्ज छाननीसाठी गैरहजर राहणाऱ्या, निष्काळजीपणा किंवा हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, 1979 अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल, अशी गंभीर सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाची तात्काळ व काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश संबंधितांना देण्यात आले आहेत.

# ऑरेंज गेट ते मरिन ड्राईव्ह बोगद्याचे काम डिसेंबर 2028 पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट

**मुंबई (प्रतिनिधी) मुंबईतील वाहतूक कोंडी फोडण्यासह जलद प्रवासासाठी ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह दुहेरी बोगद्याचे काम हाती घेतले आहे. डिसेंबर २०२८ पर्यंत काम पूर्ण करण्याचे राज्य सरकारचे उद्दीष्ट असून केंद्र सरकारने या कामासाठी ६८ कोटींचा निधी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला उपलब्ध करुन दिला आहे.**

सन २०२५-२६ च्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजनेअंतर्गत विशेष सहाय्य (कर्ज) च्या भाग-१ अंतर्गत ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्ग प्रकल्पासाठी २०० कोटींच्या निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे सादर करण्यात आला होता. त्यानुसार केंद्र शासनाने ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्ग प्रकल्पासाठी एकूण २०० कोटींचा निधी मंजूर केला असून मंजूर रकमेपैकी ६८ कोटींचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. शहरातील पूर्व मुक्तमार्गाजवळील ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह दरम्यान वाहतुकीच्या दळणवळणासाठी भुयारी मार्गाचे बांधकामासाठी १३५४ कोटी रकमेचे बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य प्राधिकरणाला उपलब्ध करुन देण्यास राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. या प्रकल्पाच्या मंजूर वित्तीय आराखड्यानुसार प्रकल्पावरील केंद्रीय कराच्या ५० टक्के रक्कम ३०७.२२ कोटी, राज्य स्तरीय करांसाठी ६१४.४४ कोटी आणि खाजगी व शासकीय जमीन कायमस्वरुपी व तात्पुरत्या स्वरुपातील जागा उपलब्ध करुन देण्याबाबतचा खर्चाची तरतूद ४३३ कोटी असे एकूण १३५४.६६ कोटी बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य राज्य शासनाकडून प्राधिकरणाला उपलब्ध करुन द्यावयाचे आहे.

## दरकपात असूनही डिसेंबरमध्ये मजबूत जीएसटी संकलन

# जीएसटी संकलनातून सरकारच्या तिजोरीत 1.74 लाख कोटी जमा

नवी दिल्ली (प्रतिनिधी) केंद्र सरकारने डिसेंबर २०२५ मधील वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) संकलनाची आकडेवारी जाहीर केली आहे. या कालावधीत जीएसटी महसूल वार्षिक आधारावर ६ टक्क्यांहून अधिक वाढला आहे. डिसेंबर २०२५ मध्ये जीएसटी संकलन १.७४ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. याआधी डिसेंबर २०२४ मध्ये देशाचा जीएसटी महसूल १.६४ लाख कोटी रुपयांहून अधिक होता. त्यामुळे डिसेंबर महिन्यात सरकारच्या तिजोरीत लक्षणीय भर पडल्याचे चित्र आहे. डिसेंबर २०२५ मध्ये जीएसटी संकलनात ६.१ टक्क्यांची वार्षिक वाढ नोंदवण्यात आली. जीएसटी दरकपात करण्यात आली असतानाही हा आकडा समाधानकारक आहे. देशांतर्गत व्यवहारांमधून मिळणारा महसूल १.२ टक्क्यांनी वाढून १.२२ लाख कोटी रुपये झाला. आयातीत वस्तूंमधून मिळणारा महसूल १९.७ टक्क्यांनी वाढून ५१,९७७ कोटी रुपये झाला. जीएसटी रिफंड ३१ टक्क्यांनी वाढून २८,९८० कोटी रुपये इतका झाला.




### जीएसटी दरकपातीचा महसुलावर परिणाम

अहवालानुसार, २२ सप्टेंबर २०२५ पासून सुमारे ३७५ वस्तूंवरील जीएसटी दर कमी करण्यात आले होते. यामुळे दैनंदिन वापरातील जवळपास ९९ टक्के वस्तू स्वस्त झाल्या. कंपेन्सेशन सेस आता केवळ तंबाखू आणि तंबाखूजन्य उत्पादनांपुरताच मर्यादित ठेवण्यात आला आहे. याआधी हा सेस लक्झरी आणि 'सिन प्रॉडक्ट्स'वरही लागू होता. तज्ज्ञांच्या मते, जीएसटी दरकपातीमुळे महसूल संकलनावर काही प्रमाणात परिणाम झाला असला, तरीही आयातीतून वाढलेले उत्पन्न आणि स्थिर देशांतर्गत व्यवहार यामुळे संकलन सकारात्मक राहिले आहे.

## सावित्रीबाई फुलेंचे जन्मगाव नायगावच्या नामांतराची मागणी

# फडणवीस म्हणाले, ग्रामसभेने ठराव पाठवल्यास विनाविलंब निर्णय घेणार



### क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या 195 व्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम

मुंबई (प्रतिनिधी) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मगावी म्हणजेच नायगाव येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक मोठी घोषणा केली आहे. 'नायगावचे नामांतर सावित्रीबाईंच्या नावाने करावे अशी मागणी होत आहे; जर ग्रामसभेने तसा ठराव दिला, तर राज्य मंत्रिमंडळ एका मिनिटात त्याला मंजुरी देईल,' असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९५ व्या जयंतीनिमित्त नायगाव येथे आयोजित कार्यक्रमात राज्याचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी नायगावचे नामांतर क्रांतीज्योती सावित्रीनगर करण्याची मागणी केली होती. या मागणीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. नायगावच्या ग्रामसभेने तसा निर्णय घ्यावा आणि तो प्रस्ताव मंत्री जयकुमार गोरे यांच्यामार्फत सरकारकडे पाठवावा. असा प्रस्ताव आल्यास आमचे मंत्रिमंडळ विनाविलंब त्याला विनाविलंब मंजुरी देईल, असे आश्वासन फडणवीस यांनी दिले.

**महाराष्ट्रात ५० लाख पेक्षा जास्त लखपती दीदी**

सावित्रीबाई फुले यांनी दाखवलेल्या मार्गावर चालताना केवळ स्मारक बांधणे हा आमचा हेतू नाही, तर महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हे आमचे लक्ष्य आहे, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'आता केवळ स्मारक करणार नाही, तर महिलांना अधिकारिता देण्यासाठी, ज्या ज्या गोष्टींची गरज आहे, त्या सगळ्या गोष्टी याठिकाणी असतील. त्याचे प्रशिक्षण याठिकाणी असेल. ग्रामविकास आणि महिला बाल कल्याण खात्याने मिळून लाडक्या बहिणींना लखपती दीदी करायचे ठरवले आहेत. लाडक्या बहिणींना सक्षम करणे ही आमची जबाबदारी आहे. आजपर्यंत महाराष्ट्रात ५० लाख पेक्षा जास्त लखपती दीदी आपण केल्यात. आता यावर्षी १ कोटी पर्यंत आपण पोहोचू. सातारा जिल्ह्यात देखील दीड लाख लाडक्या बहिणी या लखपती दीदी झालेल्या आहेत.'



**एका वर्षात घोषणा ते कामाची सुरुवात**

**मुख्यमंत्री म्हणाले की, मागील वर्षी याच दिवशी मी नायगावला आलो होतो आणि १० एकर जागेवर स्मारक उभारण्याची घोषणा केली होती. या कामाची जबाबदारी मी मंत्री जयकुमार गोरे यांच्यावर सोपवली होती. 'घोषणेच्या एका वर्षाच्या आत जागा मिळणे, आराखडा मंजूर होणे आणि प्रत्यक्ष कामाचे टेंडर निघून सुरुवात होणे, असे यापूर्वी कधीच घडले नव्हते. जयकुमार गोरे यांनी रेकॉर्ड स्पीडमध्ये हे काम पूर्ण करून दाखवले आहे,' असे गौरवोद्गार फडणवीस यांनी काढले. आजपर्यंत महाराष्ट्रात ५० लाख पेक्षा जास्त लखपती दीदी आपण केल्यात. आता यावर्षी १ कोटी पर्यंत आपण पोहोचू. सातारा जिल्ह्यात देखील दीड लाख लाडक्या बहिणी या लखपती दीदी झालेल्या आहेत.**

**नामांतराच्या निर्णयासाठी मंत्रिमंडळ सज्ज**

**नामांतराच्या मुद्द्यावर अधिक स्पष्टपणे बोलताना फडणवीस म्हणाले की, 'महात्मा ज्योतिराव फुलेंनी आणि सावित्रीबाई फुलेंनी दाखवलेल्या मार्गाने चालण्याचा प्रयत्न आम्ही करू. नायगावचे नामांतर सावित्रीबाईंच्या नावाने करण्याची मागणी आलेली आहे. या ग्रामसभेने असा निर्णय घेतला आणि जयकुमार गोरेंनी ग्रामविकास विभागाच्या मार्फत माझ्यापर्यंत पाठवला तर, विनाविलंब आमचे मंत्रिमंडळ एका मिनिटात त्याला मान्यता देईन आणि नायगावचे नाव सावित्रीआईंच्या नावाने करण्याचा निर्णय करू', असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला.**

---

# गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजनेमुळे शेतकऱ्यांचे जीवन समृद्ध होणार : बावनकुळे

हिंगोली (प्रतिनिधी) शेतकऱ्यांचे जीवन सुजलाम-सुफलाम करण्यासाठी राज्य शासनाने गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजना प्रभावीपणे राबविली असून, या योजनेमुळे शेतीचा पोत सुधारून शेतकऱ्यांना उत्तम दर्जाचे उत्पादन घेणे शक्य होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ही योजना राबविण्यात येत असून, शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा शासनाचा ठाम निर्धार आहे, असे प्रतिपादन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे) यांनी केले.

गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानांतर्गत जलेश्वर तलावातील गाळाचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना अनुदानाचे वितरण महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांच्या हस्ते येथील शिवाजीराव देशमुख सभागृहात करण्यात आले. यावेळी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, आमदार तानाजी मुटकुळे, माजी आमदार गजानन घुगे, रामराव वडकुते, डॉ. प्रज्ञा सातव, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, पोलीस अधीक्षक नीलभ रोहन आदींची प्रमुख उपस्थिती होती. महसूल मंत्री बावनकुळे यांनी हिंगोली जिल्ह्यात ही योजना यशस्वीपणे राबविल्याबद्दल आमदार तानाजी मुटकुळे व शेतकऱ्यांचे अभिनंदन केले. यापुढेही इतर तलावांमधील गाळ काढण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल. शेतकऱ्यांच्या शेतात 100 टक्के पाणी पोहोचावे यासाठी शेतीला 12 तास मोफत वीजपुरवठा देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत हा उपक्रम राबविण्यात येत आहे. विजबिलांची थकीत देयके माफ करण्यात आली असून, शेतकऱ्यांवर कोणताही आर्थिक भार पडणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.




## 141 पोलिस पाटील पदांसाठी 5 जानेवारी रोजी आरक्षण सोडत

हिंगोली (प्रतिनिधी) येथील उपविभागीय दंडाधिकारी कार्यालयाच्या आस्थापनेवरील हिंगोली व सेनगाव तालुक्यातील १४१ गावांतील रिक्त असलेल्या पोलीस पाटील पदांची भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने पोलीस पाटील पदांच्या रिक्त १४१ पदांसाठी शासनाने निश्चित केलेल्या निकषानुसार गावनिहाय आरक्षण ठरविण्यासाठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी समाधान घुटूकडे यांनी दिली आहे.

ही आरक्षण सोडत प्रक्रिया सोमवार, ५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता हिंगोली उपविभागीय अधिकारी कार्यालयातील सभागृहात पार पडणार आहे. या आरक्षण सोडतीच्या वेळी हिंगोली व सेनगाव तालुक्यातील सर्व संबंधित नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, ज्या नागरिकांना या प्रक्रियेबाबत आक्षेप किंवा हरकती असतील, त्यांनी आपले लेखी स्वरूपातील आक्षेप दि. ६ ते ७ जानेवारी २०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत उपविभागीय दंडाधिकारी, हिंगोली यांच्या समक्ष उपस्थित राहून सादर करावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी समाधान घुटूकडे यांनी केले आहे. दरम्यान बऱ्याच वर्षापासून पोलिस पाटलांची पदे रिक्त होती. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोणातून पोलिस पाटलांची महत्वाची भूमिका असल्याने ही रिक्त पदे आता भरली जाणार आहेत.

---

## मुंबईतील स्थिर निगराणी पथकातील कर्मचाऱ्यांनी येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांची कसून तपासणी करावी

मुंबई (प्रतिनिधी) संपूर्ण निवडणूक प्रक्रिया सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अत्यंत दक्षतेने आणि सतर्कतेने पार पाडावी. पारदर्शक निवडणुकीच्या अनुषंगाने नेमलेल्या सर्व समित्यांनी तत्पर राहून कार्य करावे. संपूर्ण मुंबईत नेमलेल्या स्थिर निगराणी पथकातील कर्मचाऱ्यांनी येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांची कसून तपासणी करावी, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त (शहर) डॉ.अश्विनी जोशी यांनी दिले आहेत. तसेच, 'आपले मतदान केंद्र जाणून घ्या' अभियान प्रभावीपणे राबवून मतदारांपर्यंत माहिती पोहोचवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत. मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत शनिवारी ०३ जानेवारी २०२६ रोजी त्या बोलत होत्या. महानगरपालिकेचे सहआयुक्त विश्वास शंकरवार, विविध परिमंडळांचे उपायुक्त, कोकण विभागाच्या अपर आयुक्त फरोग मुकादम, महानगरपालिकेचे सहायक आयुक्त) डॉ. गजानन बेल्लाळे, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी आदी उपस्थित होते.

## एनबीसीसी आणि मुंबई बंदर प्राधिकरणामध्ये मुंबईतील विकासासाठी सामंजस्य करार

मुंबई (प्रतिनिधी) एनबीसीसी (इंडिया) लिमिटेड आणि मुंबई बंदर प्राधिकरण (एमबीपीए) यांनी मुंबई पोर्टच्या जमिनीवर विविध विकास प्रकल्प राबवण्यासाठी २३ डिसेंबर २०२५ रोजी एका सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे. या प्रकल्पानुसार मुंबई पोर्टच्या २५ एकर जमिनीवर (कॉटन ग्रीन डेपो जवळ) 'सेंट्रल गव्हर्नमेंट ऑफिस' (CGO) कॉम्प्लेक्स विकसित करण्यात येणार आहे.

या नियोजित विकासामध्ये प्रामुख्याने सी.जी.ओ. कॉम्प्लेक्स, एक प्रतिष्ठित 'आयकॉनिक' इमारत, बहुमजली कार पार्किंग, आंतरराष्ट्रीय संमेलन केंद्र, रस्ते, इमारती, शेड आणि साठवण क्षेत्रांची देखभाल अशा प्रकल्पांचा समावेश आहे. एनबीसीसी या प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) आणि अंमलबजावणी संस्था म्हणून काम करेल. यासाठी कंपनीला एकूण प्रकल्प खर्चाच्या ७% शुल्क (GST वगळून) आकारण्याची परवानगी देण्यात आली आहे.

---

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून वितरण

# गडचिरोली पोलीस दलाच्या बळकटीसाठी 34 नव्या वाहनांचा ताफा

गडचिरोली (प्रतिनिधी) गडचिरोली जिल्ह्यातील अंतर्गत सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम, गतिमान व प्रभावी करण्याच्या दृष्टीने गडचिरोली पोलीस विभागाला ३० स्कॉर्पिओ वाहने, २ बस व २ मोटारसायकली असा एकूण ३४ वाहनांचा ताफा उपलब्ध करून देण्यात आला. या नव्या वाहनांचे वितरण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आले.

कार्यक्रमाला वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री तथा गडचिरोलीचे सहपालकमंत्री अ‍ॅड. आशिष जयस्वाल, गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार, खनिकर्म राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, आ.डॉ. मिलिंद नरोटे नक्षलविरोधी अभियानाचे विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, पोलीस उपमहानिरीक्षक अंकीत गोयल, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, जिल्हा पोलीस अधीक्षक श्री निलोत्पल उपस्थित होते. या वाहनांमुळे दुर्गम व आदिवासी भागात जलद गस्त, आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ प्रतिसाद, नक्षलविरोधी मोहिमा, तसेच दैनंदिन पोलीस कामकाज अधिक कार्यक्षमतेने पार पाडणे शक्य होणार आहे. स्कॉर्पिओ वाहने गस्त व ऑपरेशनल कामांसाठी उपयुक्त ठरणार असून, बस वाहनांचा उपयोग पोलीस पथकांच्या वाहतुकीसाठी तसेच विशेष मोहिमांसाठी होणार आहे. मोटारसायकलींमुळे अरुंद व दुर्गम मार्गांवरही पोलीस उपस्थिती वाढण्यास मदत मिळणार असल्याचे सांगण्यात आले. यावेळी पोलीस विभागाचे वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.

